महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन: यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
संकेतस्थळ: www.mahadiscom.in, ई-मेल: cecommho@gmail.com

क्र.मु.अ.(वा)/शासन/मत्स्य/कृषी/ No 0 6 0 0 2 दिनांक: 16 FEB 2026

## वाणिज्य परिपत्रक क्र. ३५१

**विषय: मत्स्यव्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर मच्छिमार, मत्स्यकास्तकार मत्स्यव्यवसायिक इत्यादीना वीजदरात सवलत देणेकरिता कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.**

संदर्भ: १. शासन निर्णय क्र: मत्स्यवि २०२३/प्र.क्र.०६/पदुम-१३, दि.०९.०५.२०२५
२. शासन निर्णय क्र: मत्स्यवि २०२३/प्र.क्र.०६ भाग-२/पदुम-१३ दि.१४.१०.२०२५
३. शासन पत्र क्र: संकिर्ण-२०२५/ प्र.क्र.२८८/ऊर्जा-५ दि.११.०२.२०२६

वरील संदर्भिय शासन निर्णय क्र.१ अन्वये राज्यातील मच्छिमार, मत्स्यसंवर्धक, मत्स्यव्यावसायिक, मत्स्यकास्तकार, मत्स्यबीज/मत्स्यबोटूकली संवर्धक व मत्स्यव्यवस्थापन (मत्स्य प्रक्रिया उद्योग वगळून) यांना कृषी समकक्ष दर्जा देण्यात येऊन कृषी दराप्रमाणे वीजदर (लघुदाब/उच्चदाब/अतिउच्चदाब) सवलत देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर मत्स्यव्यवसाय प्रकल्पास स्वतंत्र वीजमीटर असणे आवश्यक आहे.

सदर शासन निर्णयांची राज्यभर प्रभावी, एकसमान व सुलभ अंमलबजावणी होण्यासाठी संदर्भाधीन २ येथील शासन निर्णय तथा संदर्भिय शासन पत्र क्र.३ अन्वये सविस्तर कार्यपद्धती निर्गमित करण्यात आली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**शासन निर्णय:**

१. संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयामधील नमुद वीज दर सवलत अनुज्ञेय असणाऱ्या संबंधित लाभार्थ्यांने स्वसत्यापन (Self-Attestation) करून वरीलप्रमाणे वीजदरात सवलत मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) संबंधित जिल्हास्तर यांच्याकडे अर्ज सादर करणे आवश्यक राहील.
२. मत्स्यव्यवसाय प्रकल्प NFDB अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
३. अवसायनात गेलेले प्रकल्प सवलतीस पात्र ठरणार नाहीत.
४. सदर योजनेत सवलतीने मिळणाऱ्या वीजेचा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास यापूर्वी दिलेल्या सवलतीची रक्कम दंडनीय व्याजासह वसूल करण्यात येईल. तसे हमीपत्र संबंधित मत्स्यव्यवसाय विभागाने सादर करणे बंधनकारक राहील.
५. मत्स्यव्यवसायिकांना या योजनेचे लाभ हा शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून लागू होतील.

**वीजदर सवलत वितरीत करण्याची कार्यपध्दती:**

१. कृषी समकक्ष दर्जाच्या अनुषंगाने वीजदर सवलतीस पात्र लार्भाथ्यांचा आवश्यक तो तपशील / यादी सबंधित तालुका सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) यांनी सबंधित उपअभियंता महावितरण कंपनी यांना उपलब्ध करुन देतील.

२. वरीलप्रमाणे सबंधित तालुका सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) यांच्याकडून प्राप्त यादीची सविस्तरपणे पडताळणी करून सदर प्रकल्पांची महावितरणच्या संगणकीय प्रणालीवर उपलब्ध माहिती जसे की, ग्राहक क्रमांक, ग्राहकाचे नांव, ग्राहकाचा पत्ता, ग्राहकांचा वीज वापर, ग्राहकांचे वीज देयक, वीज दरातील फरकाची परिगणना इ. ची माहिती तयार करण्यात यावी.

३. वरीलप्रमाणे पात्र लाभार्थ्यांची अद्ययावत माहिती सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) यांना संबंधित उपअभियंता महावितरण कंपनी यांनी उपलब्ध करुन देण्यात यावी.

४. वीजदर सवलतीसाठी अर्जदारांची पात्रता निश्चिती तसेच विजदर सवलती संदर्भातील येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी,

   i. सहायक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) कार्यालय संबधित जिल्हा व कार्यकारी अभियंता (प्रशासन) मंडल कार्यालय महावितरण हे जिल्हास्तरावर समन्वयाचे काम पाहतील.

   ii. त्याचप्रमाणे सहायक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) कार्यालय व अतिरिक्त कार्यकारी अभियंता / उप कार्यकारी अभियंता, महावितरण हे तालुका स्तरावर समन्वय म्हणून काम पाहतील.

५. सर्व जिल्ह्यांमधील पात्र लाभार्थ्यांची माहिती व त्यासाठी लागणारा निधी याची माहिती एकत्रितपणे संकलित करून आयुक्त (मत्स्यव्यवसाय), मुंबई यांच्याकडून मुख्य अभियंता (वाणिज्य) मुख्य कार्यालय, मुंबई यांना पाठविल्या नंतर मुख्य अभियंता (वाणिज्य) महावितरण कार्यालयाकडून अग्रीम निधीची अंदाजित मागणी शासनास सादर करण्यात येईल.

६. शासन निर्णयात नमुद केल्यानुसार विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६५ नुसार वरीलप्रमाणे मागणी करण्यात आलेली रक्कम अर्थसंकल्पित करून आगाऊ अर्थसहाय्याच्या स्वरूपात वितरीत केल्यानंतर सदर योजनेचा लाभ ग्राहकांस देण्यात येईल.

मुख्य अभियंता (वाणिज्य)
महावितरण

**प्रत:**
**प्रेषण यादीप्रमाणे**

**प्रत सविनय सादर:**
मा. आयुक्त (मत्स्यव्यवसाय), मुंबई.

- उपअभियंता यांना देण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांच्या यादीची एक प्रत मुख्य कार्यालास cecommho@gmail.com या इमेलवर सादर करावी हि विनंती.

**प्रत रवाना:**
सह सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

राज्यातील मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना कृषी क्षेत्राप्रमाणे अनेक पायाभूत सुविधा व सवलतीं उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय क्षेत्रास (प्रक्रिया उद्योग वगळता) कृषी समकक्ष दर्जा देणेबाबत

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : मत्स्यवि २०२३/प्र.क्र. ०६ /पदुम १३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२.
दि. ०९ मे, २०२५

वाचा: आयुक्त मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र जा.क्र.मत्स्य/नि/१११२०६/८५/२०२२-२३ (भाग-२)/८९ दि.२०/२/२०२५

प्रस्तावना -

महाराष्ट्र एक कृषी प्रधान राज्य असून राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीबरोबरच कृषीसंलग्न क्षेत्रे जसे पशुपालन,मत्स्यपालन तसेच फळफळावळ -भाजीपाला उत्पादनासारख्या पूरक क्षेत्रांशी जोडलेली आहे. देशाला परकीय चलन तसेच प्रथिनयुक्त अन्न पुरविण्यात मत्स्यव्यवसायाचे मोठे योगदान आहे. नैसर्गिक जलस्रोतांमध्ये पारंपारिक मासेमारी हळूहळू शास्त्रोक्त मत्स्यपालनाकडे वाटचाल करीत आहे. महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचा जास्तीत जास्त शाश्वत वापर करण्यासाठी मत्स्यबीज संचयन आधारित मत्स्यपालन तसेच पिंजरा संवर्धनासारख्या विविध तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. महाराष्ट्र राज्यात कृषी प्रमाणे मत्स्यव्यवसाय क्षेत्र चांगले उत्पादन व उत्पन्न घेण्यास सक्षम आहे.

तथापि कृषी क्षेत्राशी साधर्म्य असून देखील अद्याप मत्स्य व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा प्राप्त झाला नसल्याने मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना अनेक पायाभूत सुविधा व सवलतीं पासून वंचित राहावे लागते. आंध्र प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार व कर्नाटक या राज्यांनी प्रामुख्याने मत्स्यव्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याच्या दृष्टीने वीज दरात सवलत, किसान क्रेडीट कार्ड, कृषी दरानुसार कर्ज सहाय्य, विमा दरात सवलत, उपकरणे वर सवलत अश्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. परिणामी त्या राज्यांच्या मत्स्योत्पादनात वाढ झाल्याचे निदर्शनास येते.

सबब आंध्र प्रदेश, छत्तीसगड राज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना अनेक पायाभूत सुविधा व सवलतीं उपलब्ध करून देवून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकटीकरण व राज्याच्या मत्स्य उत्पादनामध्ये भरीव वाढ करण्याच्या दृष्टीने व स्थानिक पातळीवर मत्स्यव्यवसायाद्वारे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होण्याकरिता मत्स्यव्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा देणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयाद्वारे मच्छिमार, मत्स्यकास्तकार मत्स्यउत्पादक, मत्स्यव्यवस्थापन, मत्स्यबीज संवर्धक, मत्स्यबोटुकली संवर्धन करणारे घटक, Post Harvesting यामध्ये वर्गीकरण, प्रतवारी, आवेष्ठन, साठवणूक करणारे घटक अशा व्यक्तींना कृषी क्षेत्राप्रमाणे अनेक पायाभूत सुविधा व सवलतीं उपलब्ध करून देवून राज्याच्या मत्स्य उत्पादनामध्ये भरीव वाढ करण्याच्या दृष्टीने व स्थानिक पातळीवर मत्स्यव्यवसायाद्वारे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होण्याकरिता मत्स्यव्यवसाय क्षेत्रास (प्रक्रिया उद्योग वगळता) कृषी समकक्ष दर्जा देण्यास मान्यता देण्यात येत आहे .

मत्स्यशेतकरी/संबंधित मत्स्यसंवर्धन प्रकल्प (प्रक्रिया उद्योग वगळता) यांना कृषी दराने वीज अनुज्ञेय करण्यात येत आहे. मत्स्यशेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड, बँकांकडून कृषी दराने कर्ज सुविधा, इत्यादी आणि कृषीनुसार अल्प दराने विमा संरक्षणाचा लाभ अनुज्ञेय करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना सौर उर्जेबाबत उर्जा विभागाद्वारे देण्यात येणारे लाभ मत्स्यव्यवसायिकांना देण्यास मान्यता देण्यात येत आहे .

मच्छिमार, मत्स्यसंवर्धक, मत्स्यव्यवसायिक, मत्स्यकास्तकार, मत्स्यबीज/मत्स्यबोटूकली संवर्धक, मत्स्यव्यवस्थापन यांच्या व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येत आहेत.

**मच्छिमार :-**

ज्या व्यक्तीचा प्रत्यक्ष मासेमारी करणे व मासेमारी अनुषंगिक कार्य (जसे मासे विक्री, मासे सुकविणे इत्यादी ) हा प्रमुख व्यवसाय आहे, अशा व्यक्तीस " मच्छिमार " संबोधण्यात यावे.

**मत्स्यसंवर्धक :-**

जी व्यक्ती मत्स्यतळे, मत्स्यपिंजरे, बायोफ्लॉक, RAS (पुनर्प्रसारित जलसंवर्धन प्रणाली), शोभिवंत मत्स्यव्यवसाय ( लघु / मध्यम आकारातील संवर्धन प्रकल्प ), इत्यादी विविध तंत्रज्ञानाद्वारे मत्स्यबीज संचयन करून त्याद्वारे मासे, कोळंबी, इत्यादीची निर्मिती करत असेल, अशा व्यक्तिला "मत्स्यसंवर्धक " असे संबोधण्यात यावे.

**मत्स्यव्यवसायिक :-**

मत्स्यबीज निर्मिती, मासेविक्री, मासेवाहतुक, मासे साठवणुक करणारे, माशांसाठी बर्फ निर्माते, जाळी विणणारे, जाळी पुरवठा करणारे, होडी निर्माते / पुरवठादार, मत्स्यप्रकिया करणारे मुल्यावर्धित मासळी उत्पादन करणारे तसेच माश्यांवर विविध प्रक्रिया करून जोड उत्पादने तयार करणारे इत्यादी अनेक प्रकारे मत्स्यव्यवसायाशी निगडीत कामे करणाऱ्या व्यक्ती ज्या मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व्याख्येत बसणाऱ्या व्यक्तींव्यतिरिक्त आहेत अशा व्यक्तीस " मत्स्यव्यवसायिक " संबोधण्यात यावे.

**मत्स्यकास्तकार :-**

जो शेतकरी शेततलाव अथवा शेतीमध्ये खोदकाम करुन मत्स्य तलाव तयार करेल व त्यामध्ये मासे, कोळंबी, शिंपले इत्यादीची मत्स्यशेती करेल अशा शेतकऱ्यास " मत्स्यकास्तकार" म्हणुन संबोधण्यात यावे.

**मत्स्यबीज/ मत्स्यबोटूकली संवर्धक :-**

जो व्यक्ती संचयन तलाव/संवर्धन तलाव/ संगोपन तलाव अथवा इतर कोणत्याही सामुग्री पासुन बनविलेले तलाव यामध्ये मत्स्यजिऱ्याचे संगोपन करुन मत्स्यबीज अथवा मत्स्यबोटूकली तयार करेल त्यास " मत्स्यबीज/ मत्स्य बोटूकली संवर्धक " म्हणुन संबोधण्यात यावे.

**मत्स्यव्यवस्थापन (Post Harvesting ) :-**

मासळी पकडणे (Capture) अथवा संवर्धन (Culture) द्वारे प्राप्त मासळीचे वर्गीकरण, प्रतवारी, प्रथम/ काढणी पश्चात प्रक्रिया, त्यापासून मुल्यावर्धन, संस्करण व विपणन इत्यादीची प्रक्रिया म्हणजे "मत्स्यव्यवस्थापन" असे संबोधण्यात यावे.

या शासन निर्णयाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय दि.२२/०४/२०२५ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे .

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५०५०९१४४७०५०४६८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAMASWAMI NALLAMUTHU

Digitally signed by RAMASWAMI NALLAMUTHU
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Animal Husbandry and ADF dept,
2.5.4.20=0138D8EEC69C4E56C26D100E164E69EE4C46F9D497708
72D76033D4A74ACA6D5, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=93AE2B3BE9F892A994AABD7443D2AD15D0E9E4A3
E45CA3D24B4C35707E70479C, cn=RAMASWAMI NALLAMUTHU
Date: 2025.05.09 14:49:33 +05'30'

( डॉ. रामास्वामी एन. )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत: -

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
६. अप्पर मुख्य सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई ३२
७. प्रधान सचिव (नियोजन) मंत्रालय मुंबई ३२
८. अप्पर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय मुंबई ३२
९. प्रधान सचिव (ऊर्जा) मंत्रालय मुंबई ३२
१०. प्रधान सचिव (सहकार ) मंत्रालय मुंबई ३२
११. सचिव (जलसंपदा) मंत्रालय मुंबई ३२
१२. सचिव( पदुम) मंत्रालय मुंबई ३२
१३. सचिव (लक्षेवि) मंत्रालय मुंबई ३२
१४. आयुक्त मत्स्यव्यवसाय महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मुंबई
१६. सर्व प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय
१७. सर्व जिल्हा सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय
१८. निवड नस्ती पदुम-१३

**मत्स्यव्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर मच्छिमार, मत्स्यकास्तकार मत्स्यव्यवसायिक इत्यादीना वीजदरात सवलत देणेकरिता कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांकः मत्स्यवि २०२३/प्र.क्र.०६ भाग -२ /पदुम-१३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- १४ ऑक्टोबर, २०२५

**वाचा :** - १) दि.२२/०४/२०२५ रोजी पार पडलेल्या मा. राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त
२) शासन निर्णय, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांकः मत्स्यवि २०२३/प्र.क्र.०६/पदुम-१३, दि. ०९ मे, २०२५.

**प्रस्तावना :**

संदर्भाकित वाचा क्रमांक २ येथे नमूद शासन निर्णयान्वये राज्यातील मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना कृषी क्षेत्राप्रमाणे अनेक पायाभूत सुविधा व सवलतीं उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय क्षेत्रास (प्रक्रिया उद्योग वगळता) कृषी समकक्ष दर्जा देणेबाबत दि.०९/०५/२०२५ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

या शासन निर्णयान्वये राज्यातील मच्छिमार, मत्स्यकास्तकार मत्स्यउत्पादक, मत्स्यव्यवस्थापन, मत्स्यबीज संवर्धक, मत्स्यबोटुकली संवर्धन करणारे घटक, Post Harvesting यामध्ये वर्गीकरण, प्रतवारी, आवेष्ठन, साठवणूक करणारे घटक अशा व्यक्तींना वीज दरात सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे. यास अनुसरून मत्स्यकास्तकार मत्स्यव्यवसायिक इत्यादीना कृषी दराप्रमाणे वीजदरात सवलत लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

मत्स्यव्यवसाय क्षेत्रास कृषी समकक्ष दर्जा देण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर अंतर्गत मच्छिमार, मत्स्यसंवर्धक, मत्स्यव्यावसायिक, मत्स्यकास्तकार, मत्स्यबीज/मत्स्यबोटूकली संवर्धक व मत्स्यव्यवस्थापन (मत्स्य प्रक्रिया उद्योग वगळून) यांना खालील विहित अटींच्या अधीन राहून वीजदरात सवलत अनुज्ञेय करण्यात येत आहे.

राज्यातील मत्स्यव्यवसाय प्रकल्पांना कृषी दराप्रमाणे वीजदर (लघुदाब/ उच्चदाब/ अतिउच्चदाब) सवलत लागू करण्यात येत आहे. सदरची सवलत वाचा क्र. २ येथे नमूद शासन निर्णयानुसार मच्छिमार, मत्स्यकास्तकार मत्स्यउत्पादक इ. घटकांच्या व्याख्येप्रमाणे त्या घटकांतर्गत

येणाऱ्या संबंधित प्रकल्पास लागू राहील. (प्रक्रिया उद्योग वगळता) सदर मत्स्यव्यवसाय प्रकल्पास स्वतंत्र वीजमीटर असणे आवश्यक आहे.

**२. उपरोक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील -**

१. वाचा क्र.२ येथे नमूद शासन निर्णयान्वये वीज दर सवलत अनुज्ञेय असणाऱ्या संबंधित लाभार्थ्याने स्वसत्यापन **(Self- Attestation)** करून वरीलप्रमाणे वीजदरात सवलत मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) संबंधित जिल्हास्तर यांच्याकडे अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

२. मत्स्यव्यवसाय प्रकल्प NFDB अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

३. अवसायनात गेलेले प्रकल्प सवलतीस पात्र ठरणार नाहीत.

४. सदर योजनेत सवलतीने मिळणाऱ्या वीजेचा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास यापूर्वी दिलेल्या सवलतीची रक्कम दंडनीय व्याजासह वसूल करण्यात येईल. तसे हमीपत्र संबंधित मत्स्यव्यवसाय विभागाने सादर करणे बंधनकारक राहील.

**३. वीजदर सवलत वितरीत करण्याची कार्यपध्दती-**

१) वीजदर सवलतीस पात्र ठरणाऱ्या मत्स्यव्यवसाय प्रकल्पांना परिच्छेद क्र. २ येथे दिलेल्या प्रमाणपत्रांसह सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) संबंधित जिल्हास्तर यांच्याकडे अर्ज सादर करावा.

२) वीजदर सवलतीसाठी अर्जदारांची पात्रता निश्चिती तसेच विजदर सवलती संदर्भातील येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी, सहायक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) संबधित जिल्हा हे जिल्हास्तरावर समन्वय म्हणून काम पाहतील. तसेच वीजदर सवलती संदर्भातील येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत कार्यकारी अभियंता (प्रशासन) मंडल कार्यालय महावितरण हे जिल्हास्तरावर समन्वयाचे म्हणून काम पाहतील.

३) महावितरण कंपनीने पात्र अर्जदारास वीजदरात सवलत देण्यासाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी व त्याचा स्वतंत्र तपशील ठेवावा. सर्व जिल्हयातील पात्र लाभार्थ्यांची माहिती व त्यासाठी लागणार निधी यांची एकत्रितपणे संकलित करून आयुक्त (मत्स्यव्यवसाय) कार्यालय मुंबई यांच्याकडून मुख्य अभियंता (वाणिज्य) मुख्य कार्यालय, महावितरण, मुंबई यांना पाठविण्यात यावी.

४) सदर वीजदरात सवलत देण्याप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी ऊर्जा विभागाकडून महावितरण कंपनीस अर्थसहाय्य देण्यात येईल. त्याकरिता मुख्य अभियंता (वाणिज्य) महावितरण कार्यालयाकडून अग्रीम निधीची मागणी ऊर्जा विभागास करण्यात येईल.

५) विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम ६५ अनुसार वीजदरात सवलत द्यावयाची झाल्यास त्याची भरपाई विज वितरण कंपनीस आगाऊ अर्थसहाय्याच्या स्वरूपात करणे आवश्यक आहे.त्यामुळे उपरोक्त योजनेंतर्गत विज दरात सवलत देण्यासाठी होणारा अंदाजित खर्च निश्चित करून

महावितरण कंपनीने अगोदरच्या तिमाहीत अर्थसहाय्याची मागणी ऊर्जा विभागाकडे करावी. सदरची मागणी तपासून अर्थसहाय्याच्या निधीवाटपाचे आदेश ऊर्जा विभागाकडून काढण्यात येतील.

६) मत्स्यव्यवसायिकांना देण्यात येणाऱ्या वीजदर सवलतीची प्रतिपूर्ती करण्यासाठी महावितरण कंपनीस अर्थसहाय्य देण्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्याची कार्यवाही ऊर्जा विभागाने करावी. सदर योजनेवरील होणारा खर्च भागविण्यासाठी ऊर्जा विभागाकडून घेण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ या वर्षाकरिता आवश्यक अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात येईल. त्यासाठी लागणारा अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही ऊर्जा विभागाने करावी.

७) मत्स्यव्यवसायिकांना या योजनेचे लाभ हा शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून लागू होतील.

८)हा शासन निर्णय ऊर्जा विभाग, अनौपचारिक संदर्भ क्र. २२/ऊर्जा -५ /दि.१०/१०/२०२५, नियोजन अनौपचारिक संदर्भ क्र. ३८८/का-१४३१ दि.१४/१०/२०२५ व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. ५५०/२०२५/ व्यय-२ दि.१४/१०/२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१०१४१७५९१८५००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by JAKHATE KISHOR MAHADEO
Date: 2025.10.14 18:01:35 +05'30'

**( कि. म. जकाते )**

**उप सचिव महाराष्ट्र शासन**

**प्रत -**

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

८. सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग

९. सचिव (पदुम) मंत्रालय, मुंबई.

१०. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महावितरण कंपनी, मुंबई ४०००५१.

११. आयुक्त मत्स्यव्यवसाय महाराष्ट्र राज्य,मुंबई

१२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ , मुंबई

१३. मुख्य अभियंता (वाणिज्य) मुख्य कार्यालय, महावितरण, मुंबई

१४. सहआयुक्त मत्स्यव्यवसाय ( भूजल / सागरी/ निमखारे पाणी)

१५. प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय ( कोकण/पुणे/ नाशिक/ छ.संभाजीनगर /लातूर / अमरावती / नागपूर

१६. सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय (सर्व)

१७. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई, नागपूर

१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१९. सर्व कोषागार अधिकारी

२०. कृषी व पदुम विभाग, कार्यासन-पदुम१३/ पदुम-१४

२१. निवड नस्ती (पदुम-१३)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र.०२२-२२८८३४११
ईमेल : narayan.karad@nic.in

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

| | |
|---|---|
| क्र: संकिर्ण-२०२५ /प्र.क्र.२८८/ऊर्जा-५ | दिनांक : ११ फेब्रुवारी,२०२६ |

प्रति,

अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,
महावितरण कंपनी मर्या., प्रकाशगड,
वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

विषय: -मत्स्यव्यवसाय तसेच पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याबाबत व त्याप्रमाणे वीजदर सवलत अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना निर्गमित करण्याबाबत .

संदर्भ:- १.मत्सवि २०२३/प्र.क्र.०६ /पदुम-१३, दि. ०९ .०५.२०२५
२.मत्सवि २०२३/प्र.क्र.०६ भाग-२/पदुम-१३, दि.१४ .१०.२०२५
३.पविआ-०३२५/प्र.क्र.७४/पदुम-३, दि. ३१.०७.२०२५
४. पविआ-०३२५/प्र.क्र.७४/पदुम-३, दि. २९.१०.२०२५

महोदय,

वरील संदर्भाधीन १ व २ शासन निर्णयांन्वये मत्स्यव्यवसाय क्षेत्रास (प्रकिया उद्योग वगळून) तसेच पशुसंवर्धन व्यवसाय क्षेत्रास कृषी समकक्ष दर्जा देण्यात आलेला असून पात्र प्रकल्पांना कृषी दराप्रमपाणे वीजदर सवलत देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

२. सदर शासन निर्णयांची राज्यभर प्रभावी, एकसमान व सुलभ अंमलबजावणी होण्यासाठी संदर्भाधीन ३ व ४ येथील शासन निर्णयान्वये सविस्तर कार्यपद्धती निर्गमित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने महावितरण कंपनीने सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना (कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंता/शाखा अधिकारी इ.) कार्यपद्धतीबाबत आवश्यक त्या स्पष्ट सूचना निर्गमित कराव्यात. या मध्ये विशेषत: पुढिल बाबींचा समावेश असावा.

१.कृषी समकक्ष दर्जाच्या अनुषंगाने वीजदर सवलतीस पात्र लार्भाथ्यांचा आवश्यक तो तपशील सबंधित तालुका पशुसंर्वधन व दुग्धव्यवसाय अधिकारी तसेच सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी सबंधित उपअभियंता महावितरण कंपनी यांना उपलब्ध करुन देतील.

२.वीजदर सवलतीसाठी सबंधित विभागाकडून पात्र झालेल्या प्रकल्पांमधील ,ग्राहकांची संख्या/ग्राहक क्रमांक, ग्राहकांचा वार्षिक वीज वापर, ग्राहकांचे वीज देयक, वीज दरातील

फरकाची परिगणना इ. माहिती तालुका (पशुसंर्वधन व दुग्धव्यवसाय) अधिकारी तसेच सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) यांना उपलब्ध करुन देतील.

३. वीजदर सवलती संदर्भातील येणाऱ्या तांत्रिक अडचणी क्षेत्रीय स्तरावर सोडविण्यात याव्यात.

४. सर्व जिल्ह्यांमधील पात्र लाभार्थ्यांची माहिती व त्यासाठी लागणारा निधी याची माहिती एकत्रितपणे संकलित करून आयुक्त ( मत्स्यव्यवसाय ),मुंबई तसेच आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय, पुणे यांच्याकडून मुख्य अभियंता (वाणिज्य) मुख्य कार्यालय, मुंबई यांना पाठविण्यात येईल. त्यानंतर मुख्य अभियंता (वाणिज्य) महावितरण कार्यालयाकडून अग्रीम निधीची मागणी ऊर्जा विभागास करण्यात यावी. महावितरण कंपनीने पात्र लाभार्थ्यांस वीजदरात सवलत देण्यासाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी व त्याचा स्वतंत्र तपशील ठेवावा.

५. सदर वीजदरात सवलत देण्याप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी ऊर्जा विभागाकडून महावितरण कंपनीस अर्थसहाय्य देण्यात येईल. त्याकरिता मुख्य अभियंता (वाणिज्य) महावितरण कार्यालयाकडून अग्रीम निधीची मागणी ऊर्जा विभागास करावी.

६. सदर सूचना निर्गमित करताना शासन निर्णयातील सर्व तरुतुदींचे काटेकोर पालन करण्यात यावी. वरीलप्रमाणे निर्गमित करण्यात येणाऱ्या सूचना महावितरणच्या सर्व संबधित कार्यालयांना तात्काळ परिपत्रकाद्वारे कळविण्यात याव्यात,जेणेकरुन पात्र मत्स्यव्यवसाय व पशुसंवर्धन व्ययवसाय लाभार्थ्यांना वीजदर सवलतीचा लाभ विनाविलंब व सुलभरीत्या मिळू शकेल.

**सहपत्र:वरिलप्रमाणे**

आपला,

(ना.श्री.कराड)

सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत:

१. उप सचिव (मत्स्यव्यवसाय व पशुसंवर्धन), पदुम-१३ विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

२. उप सचिव (मत्स्यव्यवसाय व पशुसंवर्धन), पदुम-३ विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.